|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

जा.क्र. कबचौउमवि/11/ रुपरेषा/696/2023 दि. 21/04/2023

**पी.एचडी. विद्यार्थ्यांना संशोधनाचे शिर्षक व रुपरेषा सादर करण्यासंदर्भात सुचना/कार्यवाही (एप्रिल 2023)**
**Instructions and procedure to Ph.D. Students for Title of Research and preparation of Research Outline**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा मार्फत पीएच.डी. प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या पीएच.डी. प्रवेश पूर्व परीक्षेत (पेट-२०२१) जे विद्यार्थी उत्तिर्ण झाले होते किंवा ज्यांना परीक्षेतुन सुट देण्यात आली आहे अश्या विद्यार्थ्यांचे प्री.पीएच,डी. कोर्स वर्क चे आयोजन दि. 06/02/2023 ते 13/02/2023 या कालावधीत करण्यात आले होते. सदर प्री.पीएच,डी. कोर्स वर्क पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्री.पीएच,डी. कोर्स वर्क परीक्षा यापुर्वी जाहीर केलेल्या तारखेनुसार दि. 04/03/2023 व 05/03/2023 या कालावधीत जे अनुत्तिर्ण किंवा गैरहजर होते अश्या विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा दि. 12 एप्रिल 2023 रोजी आयोजित करण्यात आली होती. वरील परीक्षेत जे विद्यार्थी पेपर-१ आणि पेपर-२ उत्तिर्ण असतील आणि पेपर-3 (गाईड कोर्स) पुर्ण करुन उत्तिर्ण झाले असतील अश्याच विद्यार्थ्यांनी संशोधनाचे शिर्षक व रुपरेषा संशोधन मान्यता समितीपुढे (RRC) सादर करुन मान्यता घेणे आवश्यक आहे. त्या साठी संशोधन मान्यता समित्यांचे (RRC) आयोजन **जुन** महिन्याच्या **तिस-या** किंवा **चौथ्या** आठवड्यात करण्याचे प्रस्तावित आहे, या बाबत सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.

1) संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधनाचा प्रस्ताव तयार करतांना संशोधनाची रुपरेषा (Outline of Research) आपल्या विषयानुसार तयार करावी व त्यात खालील मुद्द्यांचा समावेश करणे आवश्यक आहे.
   1) संशोधनाचे शिर्षक ( Research Title)
   2) संशोधनाची प्रस्तावना (संक्षिप्त) (Introduction in Short)
   3) संशोधनाची पार्श्वभुमी (Research Background)
   4) संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन (Literature Review)
   5) गृहितक व उद्दिष्टे( Hypothesis and Objectives)
   6) दृष्टीकोन व कार्यपध्दती (Approach/Methodology)
   7) अपेक्षीत परीणाम (Expected Outcome)
   8) संदर्भ सुची (References)

   संशोधनाची रुपरेषा 10 पृष्ठांपेक्षा जास्त असु नये व त्यात प्रकरणांची संख्या व नावे नमुद करु नयेत.

2) विद्यार्थ्यांने संशोधनाचा प्रस्ताव वरीलप्रमाणे शिर्षक (Title of Research) व रुपरेषा (Outline of Research) संशोधक मार्गदर्शक यांचे कडुन तपासुन घ्यावी.
3) संशोधक मार्गदर्शक यांनी, पी.एचडी. नियमावली 1/2017 (सुधारीत) मधील मुद्दा क्र. ८(e) नुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली असलेल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रस्तावाचा अवलोकन करुन संशोधनाची रुपरेषाचे (Outline of Research) अवलोकन करावे व संशोधनाचे शिर्षक (Title of Research) निश्चित करावे. व ते संशोधन सल्लागार समिती ( Research Advisory Committee) मार्फत मान्य करुन घेणे आवश्यक आहे.
4) संबंधित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/प्रशाळा/परिसंस्था/मान्यताप्राप्त संशोधन केंदांचे मा.संचालक यांनी संशोधन सल्लागार समितीची (Research Advisory Committee) सभा **दि. २४ एप्रिल २०२३ ते २४ मे २०२३** या कालावधीत आयोजित करावी. सदर सभेत विद्यार्थ्यांनी outline सादर करणे आवश्यक आहे.
5) संशोधन सल्लागार समितीने (Research Advisory Committee) विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रस्तावाच्या शिर्षकास व रुपरेषेस ( Research Outline) मान्यता दिल्यास ( संशोधन शिर्षकात वा रुपरेषेत संशोधन सल्लागार समितीने

काही दुरुस्त्या सुचविल्यास त्या त्वरीत सुधारित करुन मार्गदर्शक यांचेकडून तपासुन घ्याव्यात), विद्यार्थ्यांनी संशोधन प्रस्तावाची (शिर्षक व रुपरेषा) प्रिंट काढून प्रत्येक पानावर, मुद्दा क्र. ८(e) नुसार गठीत संशोधन सल्लागार समिती (Research Advisory Committee) सदस्यांची स्वाक्षरी घ्यावी ( किमान अध्यक्ष, व मार्गदर्शक यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे ).

6) संशोधक विद्यार्थ्यांनी, वरील प्रमाणे कार्यवाही झाल्यावर, मान्य झालेल्या संशोधनाच्या रुपरेषेची (Research Outline,ज्यावर समिती सदस्यांच्या स्वाक्ष-या आहेत त्याची) pdf file तयार करुन (Pdf केलेल्या document ची साईज 2 MB पेक्षा जास्त असु नये.) OAASIS portal च्या Login मधुन upload करावी. शिर्षक टाईप करावे व रुपरेषा स्वतंत्र Upload करावी व प्रस्तावाची मुळ प्रत संशोधन मान्यता समितीच्या (RRC) सभेच्या वेळी सादर करावी.

7) संशोधनाचे शिर्षक इंग्रजी भाषेव्यतिरिक्त असल्यास Unicode Font चाच वापर करावा.

8) संशोधक मार्गदर्शक यांनी संशोधन सल्लागार समिती च्या (Research Advisory Committee) सभेची, विद्यार्थ्यांसह उपस्थीती अहवालाची नोंद ठेवावी.

9) संशोधनाची रुपरेषा मान्य करण्यासंदर्भात संशोधन मान्यता समिती ( Research Recognition Committee) ची सभा **जुन** महिन्याच्या **तिस-या** किंवा **चौथ्या** आठवड्यात आयोजित करण्यात येईल. त्याचे स्वतंत्र वेळापत्रक विद्यापीठाच्या website वर व OAASIS च्या Portal वर प्रसिध्द करण्यात येईल.

10) अ) जे संशोधक विद्यार्थी प्री.पी.एचडी. कोर्स वर्क च्या परीक्षेत पेपर-१ व पेपर-२ किंवा दोन्ही पेपर मधे "Not Qualified " आहेत अश्या तसेच

ब) ज्या विद्यार्थ्यांनी तात्पुरता प्रवेश शुल्क (provisional admission fee) भरलेले नाही अश्या तसेच

क) ज्या संशोधक मार्गदर्शकांनी पेपर-३ चे मार्क त्यांच्या OAASIS Portal च्या Login मधुन भरलेले नाहीत अश्या

विद्यार्थ्यांनी संशोधन सल्लागार समिती (Research Advisory Committee) समोर संशोधन प्रस्तावाचे सादरीकरण करु नये व संशोधक मार्गदर्शक यांनीही सदरचे प्रस्ताव स्विकारु नये. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या Login मधुन Link उपलब्ध होणार नाही याची नोंद घ्यावी.

11) संशोधक विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की त्यांच्या Login मधे pre phd course work च्या score card ची Link एक महिन्यानंतर बंद होणार असल्याने प्रत्येकाने Score card download करुन घ्यावे. नंतर कुठल्याही परिस्थीत ते उपलब्ध होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

21/4/23

(प्रा. एस.टी. इंगळे)
प्र.कुलगुरु,
क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव